# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 26/10/2019 (शनिवार)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर न्यु बालाजी नगर उमरेड येथे दिनांक 24/10/2019 चे 11:00 वा. ते दिनांक 25/10/2019 चे 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामराव पांडुरंग चौधरी, वय 43 वर्ष, रा. न्यु बालाजी नगर, उमरेड व त्याचा मित्र एकाच मोहल्यात राहत असुन भामेवाडा येथे एकादशीची पुजा असल्याने भजनकरीता गेले असता व तेथे मुक्काम केला. दरम्यान अज्ञात आरोपीने दोघांचेही घरात प्रवेश करून लाकडी आलमारीतुन सोन्याचे दागिने कि. 6,800/–रू. व शेजारी मित्राचे घरातुन सोन्याची गोफ कि. 34,800/–रू. व नगदी कि. 5,000/–रू. असा एकुण कि. 46,600/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 380, 457 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजितसिंग ठाकुर हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर सोनेझरी, उमरेड येथे दिनांक 24/10/2019 चे 10:00 वा. ते दिनांक 25/10/2019 चे 01:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कैलाश लक्ष्मण नवनागे, वय 47 वर्ष, रा. सोनेझरी, उमरेड यांच्या घरामागील स्वयंपाक खोलीतुन अज्ञात आरोपीने कडी तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील लाकडी कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने कि. 1,77,500/–रू. व नगदी 21,000/–रू. असा एकुण कि. 1,98,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 380, 457 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. डार्लीकर हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर श्रीइस्पात कंपनी समोर एमआयडीसी बोरी येथे दिनांक 25/10/2019 चे 06.00 वा ते 06.30 वा. दरम्यान स्पेंटेक्स कंपनी, एमआयडीसी बोरी येथील कामगारांचा 4 महिन्यापासुन पगार न मिळाल्याने तसेच कंपनी कामगाराच्या पगारातुन कपात केलेले पैसे भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा न केल्याचे कारणांवरून नमुद कंपनी कामगारांनी आरोपी नामे– 1) बल्लु श्रीवास, 2) विजय तेलंग, 3) सुधाकर देशभ्रतार, 4) कैलास सनोडीया, 5) राजेश डहरवाल, 6) संजय भोसकर व 7) प्रकाश

गुबे सर्व रा. स्पेंन्टेक्स कंपनी एमआयडीसी बोरी ता. हिंगणा ता. नागपुर यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून बेकायदेशीर सार्वजनिक रस्त्यावर वाहतुक अडवुन रस्ता बंद करून चक्काजाम केला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोउपनि श्री. दिनकर दराडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 341 भादंवी सहकलम 135 मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ तरमळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मौजा कळमेश्वर शाळा क्र. 3 समोर येथे दिनांक 24/10/2019 चे 10.22 वा ते दिनांक 25/10/2019 चे 07.07 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) श्रावन बालाजी सोनवाने, 2) सचिन निबांळकर, 3) पिंटु नानाजी निबाळकर, 4) चिंतामन गारपगारी व 5) नरेश सोनावने सर्व रा. खैरी लखमा यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादी नामे– अन्ना पुरूषोत्तम निबांळकर वय 40 रा. गोंवरी यांना रस्त्यात रोखून त्यांच्या मोटरसायकलची चाबी काढून घेतली. यानंतर सर्व आरोपीतनी फिर्यादीसोबत वाद घालून मारहाण करून त्यांना जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 149, 341, 323 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ नागपूरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर